महाराष्ट्र टाइम्स

नाशिक ■ १ फेब्रुवारी २०१६ | १६

# आदिवासींना आणा विकासाच्या प्रवाहात

आदिवासी समाज अजूनही मागासलेपणाचे जीवन जगत आहे. त्याच त्या समस्या व दारिद्र्य, बेरोजगारीमुळे ते स्थलांतरीत होतात. पाल्यांचे शिक्षण पूर्ण होत नाही. अशिक्षितपणामुळे त्यांच्या समस्यांमध्ये भरच पडते. सरकार कोणतेही असो आदिवासींकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत नाही, असा अनुभव आहे. सत्तारूढ भाजप सरकारने आदिवासींना विकासाच्या प्रवाहात आणले तर आनंदच होईल, अशी भावना राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष रामेश्वर ओरान यांनी व्यक्त केली.

टॉक टाइम्स

**• अनेक घटकांना आरक्षण हवंय, तुम्हाला काय वाटते?**

अलीकडे आरक्षण मागणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्रातही धनगर समाजाने अन्य राज्यांचे दाखल देत आदिवासी म्हणून आरक्षण मागितल्याने पेच वाढला आहे. झारखंडमध्ये ओराव धांगड अशी जमाती आहे. धांगड आणि धनगर यांचा मेळ घालणे संयुक्तिक वाटत नाही. सरकारने धनगर समाजाला आदिवासी म्हणून आरक्षण दिलेच तर तो राजकीय स्वरुपाचा निर्णय असेल. समाज त्याला स्वीकारलेच असे नाही.

**• महाराष्ट्र पाहणी दौऱ्यात काय आढळले?**

मी संगमनेर तालुक्यातील कोळवाडे आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील नांदगाव कोहळ येथील आश्रमशाळांची पाहणी केली. आदिवासी भागात पुरेसे अन्न, रोजगार, शिक्षण, पिण्यासाठी स्वच्छ



पाणी, स्वच्छतागृह अशा सर्वच मूलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे. परिणामी हा भाग विकासापासून अजून बराच दूर आहे.

**• आदिवासी समाजापुढील मुख्य आव्हाने कोणती?**

आदिवासी समाजाला दोनच गोष्टी प्राधान्याने हव्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे संरक्षण आणि दुसरे म्हणजे विकास. प्रकल्पांसाठी त्यांच्या जमिनी संपादीत केल्या जातात. मात्र, त्यांना पर्यायी जमीन किंवा पुरेसा मोबदलाही दिला जात नाही. उत्पन्नाचे साधन गेले की स्थलांतराशिवाय पर्याय उरत नाही. निवारा, पिण्याचे पाणी, औषधोपचार अशा सर्वच बाबतीत त्यांची परवड सुरू आहे.

**• आदिवासींचे स्थलांतर वाढण्याचे कारण काय?**

स्थलांतर हे चांगले आणि वाईट देखील असू शकते. एखादी व्यक्ती झारखंडमधून बाहेर पडून दिल्लीत रूळते हे स्थलांतर त्या व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीने पोषक ठरते. मात्र, स्थलांतर करूनही रोजीरोटीचा प्रश्न सुटत नसेल तर ते मारक ठरते.

**• रोजगाराच्या समस्येवर तोडगा कसा निघेल?**

राज्य आणि केंद्र सरकारची इच्छाशक्ती असेल तर आदिवासी समाजाच्या समस्या सोडविणे कठीण नाही. नाशिकमधीलच उदाहरण घ्यायचे तर त्र्यंबकेश्वर विभागात जलसंपदाचे नऊ प्रकल्प रखडले आहेत. ९५ टक्के कामे पूर्ण झाली असली तरी पाच टक्के कामे बाकी आहेत. त्यांना रोजगार मिळू शकेल. ओरीसा, झारखंड आणि काश्मिर आणि महाराष्ट्रातही आदिवासींसाठी काही चांगले प्रयोग होत आहेत. असे प्रयोग व्यापक स्तरावर होण्यासाठी पाऊले उचलली गेली पाहिजेत.

**• शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवावा?**

आदिवासी भागात पाचवीनंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना पाच ते सात किलोमीटर दूर जावे लागते. सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांना शिक्षण सोडावे लागते. म्हणूनच प्रत्येक गावात किमान दहावीपर्यंत शाळा असायला हवी. रोजगारासाठी पालकांसमवेत स्थलांतरीत होणाऱ्या मुलांना ते जातील तेथे शाळेत प्रवेश दिला गेल्यास शिक्षणाचा खर्च निकाली निघेल.

**(शब्दांकन : प्रवीण बिडवे)**

दिव्य मराठी

# दिव्य सिटी

नाशिक, सोमवार, १ फेब्रुवारी २०१६

सैनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष उमेश शिंदे, शिवा तेलंग, नितीन सातपुते आदींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

## नाशिक- प्राथमिक शिक्षक संघटनेचे मुंबईत ६ ला अधिवेशन

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे त्रैवार्षिक अधिवेशन ६ फेब्रुवारी रोजी एरोली, मुंबई येथे होणार आहे. अधिवेशनात शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यात शैक्षणिक गुणवत्ता विकास व प्राथमिक शिक्षकांच्या समस्या याविषयी तज्ज्ञ आपले मत मांडणार आहेत. अधिवेशनास जिल्ह्यातून ७ हजार शिक्षक जाणार असल्याची माहिती सरचिटणीस सुभाष आहिरे यांनी दिली.

## नाशिक- प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनवर मराठेंची निवड



फेशनल टीचर्स असोसिएशनच्या महिला निधीपदी प्रतिभा मराठे यांची निवड करण्यात ली. असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. जयंत मुळे ी ही निवड केली. प्रा. शिवाजीराव कांडेकर ी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तर राज्य निधी प्रा. के. एल. म्हस्के, विजय डोशी, प्रकाश ी यांनी निरीक्षक म्हणून कामकाज बघितले.

# प्रशासनामुळेच आदिवासींचे स्थलांतर

## केंद्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष रामेश्वर ओरॉन यांचा आरोप

प्रतिनिधी | नाशिक



केंद्रीय जमाती आयोगाचे अध्यक्ष ओरॉन यांना निवेदन देताना शिवराम झोले.

आदिवासींना शिक्षण, उत्पादनाचे साधन आणि निवारा मिळाला, तर त्यांचे स्थलांतर होणार नाही. या मूलभूत सुविधांसाठी अतिरिक्त खर्च करण्याची गरज नाही. मात्र, प्रशासन योग्य रीतीने योजना राबवित नसल्याने आदिवासींवर स्थलांतरित होण्याची वेळ येत असल्याचे केंद्रीय अनुसूचित जमातीचे अध्यक्ष रामेश्वर ओरॉन यांनी सांगितले.

स्थलांतरित आदिवासींचा मुद्दा सध्या महत्त्वपूर्ण ठरत असल्याने केंद्रीय अनुसूचित जमातीचे आयोग रामेश्वर ओरॉन, उपाध्यक्ष रवी ठाकूर हे तीन दिवसीय महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. आयोगाने रविवारी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील नांदगावसह पाड्यांवर जाऊन पाहणी केली. सायंकाळी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये सर्वाधिक बोगस आदिवासी असून, त्याचा परिणाम मूळ आदिवासींवर होत आहे. बोगस आदिवासींमुळे खऱ्या आदिवासींना उदारनिर्वाहासाठी स्थलांतर करावे लागते. आदिवासी भागात अजूनही मुली शिक्षणापासून दूर असून, केवळ सातवीपर्यंत शिक्षण मिळत आहे. योजना योग्य राबविल्या तर आदिवासींना स्थलांतरीत व्हावे लागणार नाही. महिलांना शिलाई प्रशिक्षण, पोल्ट्री, शेळीपालन असे उद्योग सुरू करून देण्याची गरज आहे. यासाठी केंद्र शासनाकडे अहवाल सादर करणार आहे. राज्यात ४३ उपजिल्हाधिकारी एसटी प्रवर्गातील असून, २५ जण बोगस आदिवासी असल्याचे त्यांनी सांगितले.

**पिचडांतर्फे कारवाईची मागण** : अनेकांनी आदिवासी समाजा घुसखोरी केली आहे. त्यामुळे बोग आदिवासी संख्या वाढली आहे. त्याम मूळ आदिवासींवर अन्याय होत आ याकडे लक्ष घालावे अशी माग मधुकर पिचड, लकी जाधव, शिव झोले, देवा वाटाणे यांनी केली.

### वेमुलाच्या आत्महत्येस कुलगुरूच जबाबदार

हैदराबाद येथील अमित वेमुला या युवकाच्या आत्महत्येप्रकरणी संबंधित विद्यापीठाचे कुलगुरूच जबाबदार असल्याचे रामेश्वर ओरॉन यांनी 'दिव्य मराठी'ला सांगितले. याबाबत ते ओरॉन म्हणाले की, विद्यार्थी हा अनुसूचित जाती किंवा जमातीचा असो, वाद तो नाही. मात्र, विद्यार्थ्यांची चूक झाली, तर त्याच्यावर कारवाई करावी. मात्र, त्याला थेट विद्यापीठ, वसतिगृहातून काढणे योग्य नाही.

नाशिक

# आदिवासींचा विकास सरकारच्या इच्छाशक्तीवर

## डॉ. रामेश्वर ओरॉन : केंद्राचे कान टोचले, शिक्षणावर भर देण्याचा सल्ला

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ३१ : आदिवासींच्या शिक्षणाबरोबरच आर्थिक स्थिती सुधारणे म्हणजेच विकास होय. पण, आदिवासींचा विकास झालेला नाही, अशा शब्दांत राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर ओरॉन यांनी आज येथे नाराजी व्यक्त केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी सरकारची



डॉ. रामेश्वर ओरॉन

शक्ती असल्यास आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास होईल, अशी टिप्पणी करतानाच त्यांनी संरक्षणाबरोबरच आदिवासींच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला.

डॉ. ओरॉन यांच्यासह आयोगाचे उपाध्यक्ष रवी ठाकूर, संचालक के. डी. बनसोर, सहसंचालक आर. के. दुबे नाशिकच्या दौऱ्यावर आले आहेत. आदिवासींच्या प्रश्नावर उद्या (ता. १) सकाळी आदिवासी विकास आयुक्तालयात बैठक होणार आहे. या बैठकीच्या पूर्वसंध्येला पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. ओरॉन म्हणाले, की प्रत्येक गावात पहिली ते दहावीपर्यंतच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी.

### बोगस आदिवासींबद्दल चिंता

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात सर्वाधिक बोगस आदिवासींनी नोकऱ्यांमधील आदिवासींच्या जागा बळकावल्या आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण पंचवीस हजारांपर्यंत असल्याची नोंद सरकारच्या दप्तरात दिसते. त्यामुळे पुण्यात झालेल्या बैठकीत मुख्य सचिवांना या प्रकरणाची चौकशी तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बोगस आदिवासींना नोकरीतून काढणे उचित नाही. म्हणून त्यांना स्वतंत्र प्रवर्ग देऊन आदिवासींची बळकावलेली पदे मोकळी करून त्या जागा आदिवासींमधून भरायला हव्यात.

### 'नाशिक पॅटर्न' देशात नेणार

राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाच्या अहवालानुसार देशात एक कोटी लोक स्थलांतरित होतात. महाराष्ट्रात मुंबई, पुण्यापाठोपाठ नाशिक जिल्ह्यात स्थलांतराचे प्रमाण मोठे आहे. आदिवासी विकास आयुक्तालयाच्या सहकार्याने दिशा फाउंडेशनच्या अंजली बोऱ्हाडे २०१३ पासून 'स्वीकार तथा संशोधन केंद्र' प्रकल्प राबवत आहेत. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २० ग्रामपंचायतींमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पेठ, त्र्यंबकेश्वर तालुक्यात स्थलांतराचे प्रमाण ७० ते ७५ टक्के आढळून आले. मग स्थलांतरित होणाऱ्या गाव आणि शहर पातळीवर प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला. स्थलांतरित आदिवासींना नाशिकमध्ये सुरक्षेवर भर देण्यात आला. या प्रकल्पाचे कौतुक करताना डॉ. ओरॉन यांनी नाशिकचा हा पॅटर्न देशात नेण्यात येईल, असे सांगितले. झारखंडमध्ये यासंबंधाने काम सुरू होईल, असे सांगून ते म्हणाले, की गावात रोजगाराची आणि सिंचनाची सुविधा झाल्यास स्थलांतराचा प्रश्न उद्भवणार नाही. शिवाय, स्थलांतरित आदिवासींच्या संरक्षणासह विकासासाठी कसल्याही खर्चाची गरज नाही. केवळ त्यादृष्टीने व्यवस्थापन व्हायला हवे.

# आदिवासी स्थलांतर मॉडेल देशभरात राबविणार : ओरन

## राष्ट्रीय जनजाती आयोगाची जिल्ह्यात पाहणी

नाशिक। दि.३० प्रतिनिधी

पायाभूत सुविधा व रोजगारामुळे आदिवासी व मजूरांचे होणारे स्थलांतर हा देशातील विकास व्यवस्थेचा महत्वाचा भाग असून हे स्थलांतर सुखकर करणे अथवा स्थलांतर रोखण्याचे नाशिक जिल्ह्यातील 'स्विकार तथा संशोधन केंद्र' चे मॉडेल देशभरातील आदिवासी भागांमध्ये राबविण्याच्या सुचना शासनाला करणार असल्याची माहिती राष्ट्रीय जनजाती आयोगाचे अध्यक्ष रामेश्वर ओरन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### काय आहे संशोधन केंद्र

आदिवासी विभाग व दिशा फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पात आदिवासींच्या स्थलांतराचे सर्वेक्षण करून त्यांचे स्थलांतर सुरक्षीत व फलदायी करण्यासाठी त्यांना स्थलांतरीत ठिकाणी मुलभूत सुविधा, वैद्यकीय सुविधा, पाणी, रेशन उपलब्ध करणे. तसेच दुसऱ्या बाजूस स्थलांतर रोखण्यासाठी गाव पातळीवर विकास आराखडा तयार करणे, शेतीसाठी पाण्याचे स्त्रोत तयार करणे, पर्यायी रोजगार उपलब्ध करणे, प्रशिक्षण देणे, योजनांची माहिती देऊन लाभासाठी मदत करणे. कायम योग्य माहिती मिळण्यासाठी कॉलसेंटरची स्थापना करण्यात येऊन सहकार्य केले जात आहे.

नाशिक येथील आदिवासी आयुक्तालय व दिशा फाऊंडेशनकडून यांच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यात होणाऱ्या आदिवासींच्या स्थालांतरचा अभ्यास करून त्यांना स्थलांतरीत ठिकाणी विविध सुविधा पुरवणे व स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून स्थालांतर रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रकल्पाची दखल राष्ट्रीय जनजाती आयोगाने घेतली असून या प्रकल्पाच्या कामांची पाहणी करण्यासाठी आयोगाचे अध्यक्ष रामेश्वर ओरेन, उपाध्यक्ष रवी ठाकूर, सचिव के. डी. बनसोड यांनी जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. योवळी आयोगाबरोबर आदिवाशी संशोधन संस्थेचे आयुक्त संभाजी सरकुंडे, दिशा सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा अंजली बोराडे आदी उपस्थित होते.

ओरन म्हणाले, देशभरात १ कोटी लोक गाव पातळीवर स्थलांतर करतात. दुसऱ्या राज्यात ४०.५ लाख तर राज्याअंतर्गत ६० लाख स्थलांतर होते. महाराष्ट्रत मुंबई, पुणे नंतर सर्वाधिक स्थलांतर नाशिक जिल्ह्यात होते. नाशिक जिह्यित प्रामुख्याने आदिवासी समाजाचे प्रमाण मोठे असून त्यांना पावसाळ्याचे दिवस वगळता उर्वरीत आठ माहिने गावात उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध न झाल्याने यासह पाण्याचा प्रश्न, निसर्गाचा असमतोल, कमी रोजगार, संधींचा अभाव यामुळे ते औद्योगिक विकास होत असलेल्या शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असून हे प्रमाण वाढत चालले आहे. हे रोखण्यासाठी देशभरात प्रयत्न करण्यात येत आहे. नाशिक आदिवासी विभागाने केलेले प्रयत्न उत्कृष्ट असून हे मॉडेल इतर राज्यात राबविण्याबाबत सूचना देण्यात येणार आहेत. यासह ओडीसा, गुजरात अशा राज्यामध्ये आदिवासींसाठी चांगल्या सुविधा असून त्या महाराष्ट्रत राबविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. वनहक्कांच्या प्रलंबित दाव्यांबाबत विचारले असता आरन म्हणाले, प्रारंभी महाराष्ट्राची सुरूवात चांगली होती. परंतु नंतर मात्र राज्य मागे पडले त्या तुलनेत गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांनी चांगले काम केले आहे. केंद्रीय सचिवांशी चर्चा करून वनहक्क दाव्यांची १०० टक्के प्रलंबीतता काढून टाकण्याबाबत देशभरात आदेश देण्याबाबत सूचना करण्यात येणार आहे. या आयोगाने आज जिल्ह्यातील नांदगाव कोहळे, कोळवाडे व त्र्यंबक तालुक्यातील काही आदिवासी गावांना भेटी देऊन पाहणी केली.

### जाती घुसखोरीत महाराष्ट्र बदनाम

आरक्षीत जातीची बोगस प्रमाणपत्र मिळवून त्या जातीत घुसखोरी करण्यात महाराष्ट्र व मध्यप्रदेश बदनाम आहेत. बोगस प्रमाणपत्र दाखून त्या जातीचे आरक्षाचा लाभ घेतला जात आहे. यामधून त्या जीतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे. अशी बोगस प्रमाणपत्र दाखून नोकरी मिळविणाऱ्यांना दुसरीकडे बदली करून पुन्हा त्या जीतीची जागा तेथे उपलब्ध करण्यात याव्यात. बोगस प्रमाणपत्र देणारांना कडक शिक्षा व नोकरीपुर्वीच पडताळणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. असे ओरण यांनी सांगीतले.

# Migrating tribals must get shelter, food, says NCST chairman

Abhilash.Botekar
@timesgroup.com

**Nashik:** The National Commission for Scheduled Tribes (NCST) has recommended a slew of measures to ensure that tribals migrating to Nashik in search of jobs are given temporary shelters and food under the Food Security Act as demanded by a city-based NGO.

Rameshwar Oraon, chairman of NCST, has also suggested that such systems should be implemeted in major cities where tribals temporarily migrate in search of jobs.

On a three-day visit to Nashik, Oraon on Monday held a meeting with the officials of the tribal development department and asked them to create some infrastructure for providing some relief to the migrating tribals, as recommended by NGO Disha Foundation.

"The Nashik-based NGO has recommended several measures through the central government-sponsored Migration Information and Research Centre, in association with the tribal development department. We are serious about the demands raised by the organisation in the interest of tribals. Hence, we suggest that the Nashik Municipal Corporation comes up with some solutions for the tribals migrating here this summer. They should also get food under the Food Security Act with the officials concerned taking necessary steps," Oraon said in the meeting.

Officials of the civic body and the district administration were also present at the meeting.

He asked the officials to prepare a plan in this regard and execute it. He also hoped that a similar place is replicated in other tribal areas and states.

Oraon said the condition of hostels and ashramshalas for tribal students in the state was very bad. These students do not get proper food and other goods, the NCST chairman said.

> During our visit to some ashramshalas and the representations that we got from several elected representatives and tribal associations, we are of firm belief that the tribals do not get proper lodging and boarding facilities. In such situations, how can we expect tribal children to focus on education?
>
> **Rameshwar Oraon** | CHAIRMAN, NATIONAL COMMISSION FOR SCHEDULED TRIBES

"During our visit to some ashramshalas and the representations that we got from several elected representatives and tribal associations, we are of firm belief that the tribals do not get proper lodging and boarding facilities. In such situations, how can we expect tribal children to focus on education?" he questioned.

Oraon also took cognizance of several allegations of corruption levelled by the elected representatives and said he would look into them and suggest measures to the central government to ensure that the tribals do not suffer.

"It is a well-known fact that government schemes for tribals have been misused on a number of occasions and non-tribals have benefited from them. We are also aware that Maharashtra, one of the leaders in issuing fake tribal certificates, has about one lakh people with fake certificates. These people are enjoying the benefits meant for tribals. We will take up the issue at the Central level," he added.

WEATHER

महाराष्ट्र टाइम्स

नाशिक ■ १ फेब्रुवारी २०१५ | १५

# आदिवासींना आणा विकासाच्या प्रवाहात

आदिवासी समाज अजूनही मागासलेपणाचे जीवन जगत आहे. त्याच त्या समस्या व दारिद्र्य, बेरोजगारीमुळे ते स्थलांतरीत होतात. पाल्यांचे शिक्षण पूर्ण होत नाही. अशिक्षितपणामुळे त्यांच्या समस्यांमध्ये भरच पडते. सरकार कोणतेही असो आदिवासींकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत नाही, असा अनुभव आहे. सत्तारूढ भाजप सरकारने आदिवासींना विकासाच्या प्रवाहात आणले तर आनंदच होईल, अशी भावना राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष रामेश्वर ओरान यांनी व्यक्त केली.



**• अनेक घटकांना आरक्षण हवंय, तुम्हाला काय वाटते?**

अलीकडे आरक्षण मागणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्रातही धनगर समाजाने अन्य राज्यांचे दाखल देत आदिवासी म्हणून आरक्षण मागितल्याने पेच वाढला आहे. झारखंडमध्ये ओराव धांगड अशी जमाती आहे. धांगड आणि धनगर यांचा मेळ घालणे संयुक्तिक वाटत नाही. सरकारने धनगर समाजाला आदिवासी म्हणून आरक्षण दिलेच तर तो राजकीय स्वरुपाचा निर्णय असेल. समाज त्याला स्वीकारलेच असे नाही.

**• महाराष्ट्र पाहणी दौऱ्यात काय आढळले?**

मी संगमनेर तालुक्यातील कोळवाडे आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील नांदगाव कोहळ येथील आश्रमशाळांची पाहणी केली. आदिवासी भागात पुरेसे अन्न, रोजगार, शिक्षण, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, स्वच्छतागृह अशा सर्वच मूलभूत सोयी सुविधांचा अभाव आहे. परिणामी हा भाग विकासापासून अजून बराच दूर आहे.

टॉक टाइम

**• आदिवासी समाजापुढील मुख्य आव्हाने कोणती?**

आदिवासी समाजाला दोनच गोष्टी प्राधान्याने हव्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे संरक्षण आणि दुसरे म्हणजे विकास. प्रकल्पांसाठी त्यांच्या जमिनी संपादीत केल्या जातात. मात्र, त्यांना पर्यायी जमीन किंवा पुरेसा मोबदलाही दिला जात नाही. उत्पन्नाचे साधन गेले की स्थलांतराशिवाय पर्याय उरत नाही. निवारा, पिण्याचे पाणी, औषधोपचार अशा सर्वच बाबतीत त्यांची परवड सुरू आहे.

**• आदिवासींचे स्थलांतर वाढण्याचे कारण काय?**

स्थलांतर हे चांगले आणि वाईट देखील असू शकते. एखादी व्यक्ती झारखंडमधून बाहेर पडून दिल्लीत रूळते हे स्थलांतर त्या व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीने पोषक ठरते. मात्र, स्थलांतर करूनही रोजीरोटीचा प्रश्न सुटत नसेल तर ते मारक ठरते.

**• रोजगाराच्या समस्येवर तोडगा कसा निघेल?**

राज्य आणि केंद्र सरकारची इच्छाशक्ती असेल तर आदिवासी समाजाच्या समस्या सोडविणे कठीण नाही. नाशिकमधीलच उदाहरण घ्यायचे तर त्र्यंबकेश्वर विभागात जलसंपदाचे नऊ प्रकल्प रखडले आहेत. ९५ टक्के कामे पूर्ण झाली असली तरी पाच टक्के कामे बाकी आहेत. त्यांना रोजगार मिळू शकेल. ओरीसा, झारखंड आणि काश्मिर आणि महाराष्ट्रातही आदिवासींसाठी काही चांगले प्रयोग होत आहेत. असे प्रयोग व्यापक स्तरावर होण्यासाठी पाऊले उचलली गेली पाहिजेत.

**• शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवावा?**

आदिवासी भागात पाचवीनंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना पाच ते सात किलोमीटर दूर जावे लागते. सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांना शिक्षण सोडावे लागते. म्हणूनच प्रत्येक गावात किमान दहावीपर्यंत शाळा असायला हवी. रोजगारासाठी पालकांसमवेत स्थलांतरीत होणाऱ्या मुलांना ते जातील तेथे शाळेत प्रवेश दिला गेल्यास शिक्षणाचा खर्च निकाली निघेल.

(शब्दांकन : प्रवीण बिडवे)